# कार्यालय नगर पंचायत गोधणी (रेल्वे)

ता.नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर

Email–npgodhanirailway@gmail.com

जा.क्र/न.प.गो.(रे.)/अग्नि.वि/ ५२ /२०२६ दिनांक :- ०९/०१/ २०२६

प्रती,

S.T. Josephs society Kumhari
On KH No.288-287, Godhani. Nagpur

विषय :- सेंट जोसेफ स्कूल, गोधनी इमारतीचे नियमित अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्राचे नूतनीकरण करणेबाबत.

संदर्भ- 1) आपली अर्ज क्रमांक ४१४२दिनांक:-१५/१०/२०२५

वरील विषयांकित संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने आपण आपल्या शाळेच्या इमारतीस पंकज म.अखंडे नागपुर यांचे अंकेक्षण अहवाल A-Form नुसार अग्निशमन सुरक्षेची सर्व साधने लावल्यामुळे संदर्भीय अर्जानुसार अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक १४/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता आपले इमारतीचे निरिक्षण केले असुन त्याकरिता अग्निशमन सुरक्षा बाबतचे खालील अटी व शर्तीवर नियमित ना हरकत प्रमाणपत्राचे नुतनिकरण करण्यात येत आहे.

1) शाळेच्या इमारतीचे उंची पर्यंत चढण्यासाठी व आकस्मित रित्या उतरण्याकरीता अतिदक्षता शिडी नियमित ठेवणे आवश्यक राहील.

2) अधिकृत संस्थेद्वारे माहे जानेवारी ते माहे जुन व माहे जुलै ते माहे डिसेंबर या कालावधी करिता वर्षातून दोन वेळा प्रत्येक सहा महिण्याच्या कालावधीचे B-Form सादर करने आवश्यक असेल असे न केल्यास आपणास दिलेले नियमित अग्निशमन सुरक्षा नाहरकत प्रमाणपत्र रद करण्यात येईल.

3) आपल्या शाळा इमारतीचे बांधकाम हे नकाशा प्रमाणेच होणे आवशक आहे.

4) आपल्या शाळा इमारतीचे अधिकृत संस्थेकडून लेखा केले असुन या अनुषगाने महाराष्ट्र अग्निशमन सुरक्षा व जीव सुरक्षा उपाय अधिनियम 2006 भाग-1 व भाग-2 (MAH III Of 2007) अंतर्भूत असलेल्या अग्निशमन संयंत्र व साधनाचे व्यवस्थापनाची तपासणी दरवर्शी अधिकृत संस्थे कडून करून घ्यावी व याबाबत नगर परिषदेला सुचित करावे. या कालावधीत आगी सारखी घटना घडली तर होणा-या जीव व वित्त हाणीची जबाबदारी आपली स्वताःची राहील

5) आपल्या शाळा इमारतीचे महाराष्ट्र अग्निशमन सुरक्षा व जीव सुरक्षा उपाय अधिनियम 2006 भाग-1 व भाग-2 नुसार बसविण्यात आलेल्या अग्निशमन यंत्र व साधनामध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास तो

ताबडतोब दुरूस्त करून घ्यावा असे न केल्यास नियमित अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र रदद करण्यात येईल.

6) आपणास देण्यात आलेले अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्रची मुदत हे दिलेल्या तारखेपासून **एक वर्षा** करिता राहील. त्यापूर्वी नुतनीकरण करून घ्यावे. विहीत मुदतीत आपण नुतनीकरण करून न घेतल्यास नियमित अग्निशमन सुरक्षा ना हरकत प्रमाणपत्र रदद करण्यात येईल तसेच नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 व महाराष्ट्र अग्निसुरक्षा व जीव सुरक्षा उपाय योजना अधिनियम 2006 कलम (6) व (7) आणी भारतीय उत्स्फोटककायदा दि गॅस सिलेंडर नियम व दि पेट्रोलियम कायदा 1934 नियम 1976 नुसार आपणावर कार्यवाही करण्यात येईल यावर आपला कसलाही उजर राहणार नाही.

नगरपंचायत गोधणी (रेल्वे) जि. नागपूर

मुख्याधिकारी
नगर पंचायत गोधनी (रेल्वे)